*खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे*

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

***मराठी विभाग आयोजित***

मराठी विभागाच्या वतीने 'लोकजागर' विशेषांकाचे प्रकाशन

दि. २४.२.२०१८

---

मराठी विभागाच्या वतीने मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून लोकसाहित्यातील संकलित लोकगीतांवर आधारित 'लोकजागर' या विशेषांकाची निर्मिती करण्यात आली. त्यासाठी काही विद्यार्थ्यांवर आपापल्या गावातल्या अनुभवी व्यक्तींना भेटून लोकगीतांचे संकलन करण्याची जबाबदारी सोपविली. विद्यार्थ्यांनीही अत्यंत उत्साहाने विविध प्रसंगी म्हटली जाणारी लोकगीते संकलित केली. त्यामध्ये कृषीगीत, पाळणा, ओवी, फुगडीगीत, लग्नाची गीते, देवगीत आदि लोकगीतांचा समावेश  करण्यात आला आहे. या अंकाचे प्रकाशन प्रसिद्ध कवी भरत दौंडकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, विज्ञान शाखचे उपप्राचार्य डॉ.व्ही.डी.कुलकर्णी, कला शाखेचे उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ.बी.डी.अनुसे व विद्यार्थी विद्यापीठ प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

डॉ. संजय शिंदे<br>
मराठी विभाग प्रमुख



लोकजागर अंकाचे प्रकाशन करताना कवी भरत दौंडकरए प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील



लोकमत पुणे, सोमवार, दि. २६ फेब्रुवारी २०१८ ४

# सामाजिक बहिरेपण भविष्यासाठी घातक : दौंडकर

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : महाराष्ट्राला प्रबोधनाची मोठी परंपरा असूनही समाज संकुचित होत चालला आहे. स्वच्छ अभियानाच्या झाडूने माणसाच्या मनातील जातीपातीचा, अंधश्रद्धेचा, दांभिकतेचा कचरा कसा झाडायचा हा प्रश्न गंभीर असून वाढते सामाजिक बहिरेपण समाजासाठी घातक असल्याचे प्रतिपादन कवी भरत दौंडकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात 'माता, माती व संस्कृती' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, विद्यापीठ प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर, कला व वाणिज्य शाखेतील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

भरत दौंडकर यांनी बोलताना प्रत्येकाने मातीशी इमान ठेवायला हवे असे सांगून शेती विकून मौज करणाऱ्यांवर आधारित 'गोफ' कविता सादर केली. गुंठा गुंठा जमीन विकून गोफ गळ्यात आला असला, तरी उद्या एक एक प्लेट माती हुंगायला रक्त डोळ्यात येईल, या वास्तवाची त्यांनी जाणीव करून दिली. नोटाबंदीमुळे सामान्यांचे नुकसानच झाले असून नोटांचे रंग बदलले परंतु गरिबीचा रंग तसाच असल्याची अस्वस्थता त्यांनी मांडली.

विचारवंतांच्या हत्येबद्दल चिंता व्यक्त करताना अजून किती जणांच्या रक्ताने आपली माती मलीन होणार आहे, दाभोलकरांच्या खुनाची केस नक्की उलगडणार आहे, की तुकारामांसारखी वैकुंठात विलीन होणार आहे, असा प्रश्न व्यवस्थेला विचारून 'स्वप्नांचे खून' ही कविता सादर केली.

विद्यार्थ्यांकडे जर प्रतिभा आणि कल्पनाशक्तीच्या साहाय्याने नेमक्या शब्दांत वास्तवाचे नेटके दर्शन घडविण्याची क्षमता असेल तर कवितेचं क्षेत्र करिअर म्हणून निवडायला हवे, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी आपापल्या गावातून संकलित केलेल्या लोकगीतांचा 'लोकजागर' नावाच्या संपादित विशेषांकाचे प्रकाशन या वेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार प्रा. वर्षा कांबळे यांनी मानले.

महाविद्यालयातील मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी आपापल्या गावातून संकलित केलेल्या लोकगीतांचा 'लोकजागर' नावाच्या संपादित विशेषांकाचे प्रकाशन कवी भरत दौंडकर यांच्या हस्ते करण्यात आले.